**रे. दि. मु. ४५५/२०२१**

दिनकर गणपती मोहिते वि. सचिन हैबती मोहिते व इतर

## रे. दि. मु. ४५५/२०२१ मधील नि.४६ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज, वादीचे वारस रेकॉर्ड वर घेऊन त्याप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी म्हणुन दाखल केला आहे.

२. त्याच्या म्हणण्यानुसार, त्याच्या वडीलांचा म्हणजेच वादीचा वार्धक्याने दि. ३१.०५.२०२३ रोजी निधन झाले आहे. त्यांना एकच मुलगा असुन तो मुंबई येथे पोलीस खात्यात नोकरीस असल्याने वकीलांशी संपर्क साधता आला नाही. त्यांना जीवन दिनकर मोहिते यांच्या व्यतिरीक्त अन्य वारस नसुन त्यांचे नाव अभिलेखावर दाखल करुन घ्यावी अशी विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे दाखल करुन २४० दिवसांचा विलंब झाला असल्याचे व विलंबास कायदेशीर कारण नसुन अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली आहे.

४. मयत वादी दिनकर मोहिते यांनी सदरचा दावा वाटप व निरंतर ताकीदीकरीता दाखल केला होता. वादीच्या वारसाने वादीचे मृत्युपत्र **(नि. ४९/२)** दाखल केले असुन दि. ३१.०५.२०२३ रोजी वादीचा मृत्यु झाल्याचे दिसुन येत आहे. अर्जदार हे वादीचे वारस असल्याने त्यांना दाव्यात वारस म्हणुन सामील करणे गरजेचे आहे. सबब मी खालील आदेश पारित करीत आहे.

### आ दे श

१. अर्ज **(नि.४६)** खर्च मंजूर करणेत येतो.

२. अर्जदाराने योग्य ती दुरुस्ती करुन दुरुस्ती प्रत पुढील तारखेपर्यंत अभिलेखावर दाखल करावी.

PRAJAKTA GAJANAN SHELAR

Digitally signed by PRAJAKTA GAJANAN SHELAR
Date: 2024.08.07 17:49:19 +0530

स्थळ : कराड ( पी.जी.शेलार )

दिनांक :– ०७.०८.२०२४ ६वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कराड.